जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

निविदा सूचना

क्रमांक/संगणक/३९९/२०२५. दिनांक: ३० /१०/२०२५

माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांचे दिनांक ३०/१०/२०२५ चे आदेशान्वये जिल्हा न्यायालय, भंडारा येथील खालील नमूद एकूण ४८ सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व संलग्न प्रणालीचा **एक वर्षाकरिता** सर्वसमावेषक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करार Comprehensive Annual Maintenance Contract करण्याकरिता स्थानिक बाजारातून सिलबंद/मोहोरबंद निविदा दिनांक ०७/११/२०२५ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. इच्छूक कंपनी/अभियंता यांनी प्रपत्र क्रमांक १ व २ तसेच नमूद अटी व शर्तीसह सिलबंद/मोहोरबंद निविदा दिनांक ०७/११/२०२५ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, भंडारा येथे सादर करावे.

तद्नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

प्रपत्र क्रमांक १

Sr. No.	Particulars	Company/Model	Quantity	Total Comprehensive Annual Maintenace Cost in Rs. (Including GST)
1.	C. C. T. V. Camera	CP Plus 4/5 MP Network Bullet Camera	48	
2.	Network Video Recorder	CP Plus 16 Channel UNR-4K2162-V3 12V DC, 4A	03	
3.	P. O. E. Switch	Secureye 16 Port, 10/100/1000 Giga byte	01	
		CP Plus 08 Port , 10/100/1000 Giga byte	08	
4.	Harddisk	Seagate 6 TB	06	
5.	Cat-6 Cable	D-Link	Approx . 1500 Meter	
		Digisol		
6.	HDMI Cable (NVR to Display)	2 Meter	03	
		10 Meter	03	

प्रपत्र क्रमांक २

(कार्यालयास नवीन सी. सी. टी. व्ही. कॅमेरे व संलग्न हार्डवेअर खरेदी करून लावण्याची गरज पडल्यास)

Sr. No.	Particulars	Company/Model	Rate Per Nos/ Per Item/ Per Meter.
1.	C. C. T. V. Camera	CP Plus 6 MP Network Bullet Camera (Full Colour Night Vision)	
		CP Plus 8 MP Network Bullet Camera (Full Colour Night Vision)	
		HD Crystal 6 MP Network Bullet Camera (Full Colour Night Vision)	
		HD Crystal 8 MP Network Bullet Camera (Full Colour Night Vision)	
		Dahua 6 MP Network Bullet Camera (Full Colour Night Vision)	
		Dahua 8 MP Network Bullet Camera (Full Colour Night Vision)	
		CP Plus 4MP WDR 32x IR 180 Mtr. Speed Dome PTZ Network Camera	
		HD Crystal 5MP 36X 150 Mtr. PTZ Network Camera	
		Dahua 4+4 MP 25X 100 Mtr. PTZ Network Camera	
2.	Network Video Recorder	CP Plus 08 Channel Dual SATA (which supports 6 TB & above Harddisks)	
		CP Plus 16 Channel Dual SATA (which supports 6 TB & above Harddisks)	
		HD Crystal 08 Channel Dual SATA (which supports 6 TB & above Harddisks)	
		HD Crystal 16 Channel Dual SATA (which supports 6 TB & above Harddisks)	
		Dahua 08 Channel Dual SATA (which supports 6 TB & above Harddisks)	
		Dahua 16 Channel Dual SATA (which supports 6 TB & above Harddisks)	
3.	P. O. E. Switch	CP Plus 08 Port 10/100/1000 Giga byte	
		CP Plus 16 Port 10/100/1000 Giga byte	
		HD Crystal 08 Port 10/100/1000 Giga byte	
		HD Crystal 16 Port 10/100/1000 Giga byte	
		Dahua 08 Port 10/100/1000 Giga byte	
		Dahua 16 Port 10/100/1000 Giga byte	
4.	Harddisk	WD 6 TB	
		WD 10 TB	
		Seagate 6 TB	
		Seagate 10 TB	
		Aver-tek 6 TB	
		Aver-tek 10 TB	
5.	Cat-6 Cable	D-Link	
		Digisol	
6.	RJ45 Connector	D-Link	
		Digisol	
7.	HDMI Cable (NVR to Display)	5 Meter	
		10 Meter	

सी. सी. टी. व्ही कॅमेरा प्रणालीकरिता सर्वसमावेषक वार्षिक देखभाल/ दुरुस्तीबाबत अटी व शर्ती

१.	सदर करार जिल्हा न्यायालय, भंडारा या न्यायालयातील उपरोक्त नमूद सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपरकरणे करिता राहील. उपरोक्त नमूद सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे मध्ये बिघाड आल्यास ते दुरुस्तीकरीता/नवीन खरेदी करून लावण्याकरिता संबंधित कंपनी/अभियंता यांना या न्यायालयात स्वत: येऊन सी. सी. टी. व्ही. कॅमेरा किंवा त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे ज्या न्यायालय/परिसरात आहेत त्या न्यायालय/परिसरात स्वत: जावून सदर सी. सी. टी.व्ही. कॅमेरा व त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे दुरुस्ती करावे लागेल.
२.	सदर करार सर्वसमावेषक वार्षिक देखभाल व दुरुस्ती (Comprehensive Annual Maintenance Contract) पध्दतीचा राहील. सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे दुरुस्ती /नवीन खरेदी करुन देणे संबंधित कंपनी/अभियंता यांचेवर बंधनकारक राहील.
३.	निविदा सादर करणारे कंपनी/अभियंता यांनी निविदा सादर करतेवेळी निविदेतील प्रपत्र क्रमांक १ व २ तसेच अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचावे तद्नंतर त्यांची कमीत कमी दराची निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावी. निविदेमध्ये नमूद करण्यात आलेले दर सर्व कर आणि इतर शुल्कासहित असावे.
४.	निविदा सादर करताना त्यासह कंपनीचा नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, नजीकच्या काळात सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व संलग्न प्रणालीशी संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालये यांचेसोबत करार केलेल्या वार्षिक देखभाल/दुरूस्ती (कमीत कमी ०१) इ. कागदपत्रांच्या स्वयंःप्रमाणित छायाप्रत सादर करणे बंधनकारक राहील.
५.	करार झाल्यावर कंपनी/अभियंता यांना दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात जिल्हा न्यायालय, भंडारा येथे येऊन सर्व सी. सी. टी. व्ही. कॅमेरांची पडताळणी करून ते सुरळीत सुरु असल्याबाबतचे रिपोर्ट/अहवाल संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, भंडारा येथे सादर करणे बंधनकारक राहील.
६.	कंपनी/अभियंता यांचेकडे सी. सी. टी. व्ही. प्रणाली दुरुस्तीबाबत तोंडी / लेखी तक्रार दिली असता त्यांना सदरहू तक्रार ४८ तासाचे आत दुरुस्ती करुन द्यावी लागेल. असामान्य परिस्थितीत प्रपत्र क्रमांक १ मधील कोणतेही सी. सी. टी. व्ही. कॅमेरा किंवा त्याला सलंग्न इतर हार्डवेअर/उपकरणे उपरोक्त नमूद कालावधीत दुरुस्त होत नसल्यास किंवा त्याचे सुटे भाग उपलब्ध होत नसल्यास त्यांचे वैध कारण सर्व्हीस रिपोर्ट मध्ये नमूद करणे बंधनकारक राहील. संबंधित हार्डवेअरचे वैध कारण लक्षात घेऊन अशा दुरुस्तीकरिता जास्तीत जास्त ०५ दिवसाचा कालावधी देण्यात येईल. परंतु कार्यालयास कामकाजात अडचण निर्माण होऊ नये म्हणून त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था म्हणून तात्काळ दुसरे सी. सी. टी. व्ही. कॅमेरा किंवा त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे उपलब्ध करून देणे कंपनी/अभियंता यांचेवर बंधनकारक राहील.
७.	तक्रार दाखल केलेले सी. सी. टी. व्ही. कॅमेरा किंवा त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे उपरोक्त दिलेल्या कालावधीत दुरुस्ती न केल्यास प्रति दिवस १००/- रुपये शंभर फक्त इतका दंड आकारण्यात येईल व सदरचा दंड संबंधित कंपनी/अभियंता यांना देय/प्रलंबित असलेल्या देयकामधून वजा करण्यात येईल.
८.	निविदा मंजुर झालेल्या कंपनी/अभियंता यांना रूपये ५००/- च्या बॉन्ड पेपरवर आपला करार लिहून द्यावा लागेल व सदरहू बॉन्ड पेपर करिता आलेला खर्च कंपनीला सोसावा लागेल. तसेच अनामत रक्कम म्हणून एकूण रूपये १०,०००/- अक्षरी रुपये दहा हजार फक्त या कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. करार संपल्यानंतर सदरची अनामत रक्कम कंपनी/अभियंता यांना परत करण्यात येईल.
९.	कोणत्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. देयक हे द्विप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. देयक हे त्रैमासिक संपल्यानंतर सादर केल्यावर नियमानूसार अदा करण्यात येईल. नियमानूसार लागू होणारे कर/शुल्क/दंड कपात करण्यात येईल.
१०.	कंपनी/अभियंता ०१ वर्षाचा सर्वसमावेषक वार्षिक देखभाल व दुरूस्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्याच दर, अटी आणि शर्तीनुसार वार्षिक देखभाल कराराचा कालावधी वाढविण्यास इच्छूक आहे किंवा नाही हे सूचित करु शकतो.
११.	प्रपत्र क्रमांक २ मध्ये मागितलेले सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व संलग्न इतर प्रणालीचे दर हे भविष्यात खरेदी करिता आहेत. कार्यालयास जेव्हा जेव्हा नवीन सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व संलग्न प्रणालीची गरज भासेल तेव्हा तेव्हा मंजूर निविदेनुसार नवीन सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व संलग्न प्रणाली खरेदी केली जाईल.
१२.	सदर निविदा सूचनेमध्ये प्रपत्र क्रमांक १ मध्ये नमूद कोणतेही सी. सी. टी. व्ही. कॅमेरा किंवा त्याला संलग्न इतर हार्डवेअर/उपकरणे कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णत: वगळण्याचे अधिकार किंवा त्यामध्ये इतर हार्डवेअर समाविष्ट करण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.
१३.	सदर करार हा मंजूर झाल्याचा दिनांकापासून ते पूढील एक वर्षाकरीता वैध राहील. परंतु कार्यालयास वाटल्यास तो कोणत्याही क्षणी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

टिप: १. निविदा सादर करतांना लिफाफ्याच्या पृष्ठभागावर " सी. सी. टी. व्ही. कॅमेरा व संलग्न प्रणालीकरिता सर्वसमावेषक वार्षिक देखभाल व दुरूस्ती बाबतची निविदा" असा स्पष्ट उल्लेख करावा.

२. निविदा उपरोक्त दिलेल्या प्रपत्र क्रमांक १ व २ नुसारच सादर करावे. त्यात कोणताही बदल करू नये.

३. निविदा सादर करतांना अटी व शर्ती क्रमांक ४ मध्ये नमूद कागदपत्रे न चुकता सादर करावे.

४. निविदा सादर करतांना उपरोक्त नमूद अनु क्रमांक १ ते १२ मधील अटी व शर्ती मान्य असल्याचे स्पष्ट नमूद करावे.

आदेशान्वये,

30/10/15

(एस. एम. निनावे)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा